पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

संलग्न - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर

# राष्ट्रीय सेवा योजना

## शैक्षणिक वर्ष २०२४ -२५

# नियमित कार्यक्रम

## वार्षिक अहवाल

कार्यक्रमाधिकारी
डॉ. रामकिशन लोमटे

प्राचार्य
डॉ. सुभाष टाकले

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | योग शिबिराचे आयोजन -२१ जून २०२४ | ३ - ४ |
| २ | महाराष्ट्र कृषी दिन- वृक्षारोपण | ५ |
| ३ | जागतिक लोकसंख्या दिन- दि.११ जुलै २०२४ | ६ |
| ४ | 'एक पेड मा के नाम'- महावृक्ष लागवड | ६ - ९ |
| ५ | मतदार नोंदणी मार्गदर्शन शिबीर दि.६ ऑगस्ट २०२४ | ९-१० |
| ६ | वृक्ष रोपे वाटप दि. ८ ऑगस्ट २०२४ | १०-११ |
| ७ | क्रांती दिन – चित्र प्रदर्शन दि. ९ ऑगस्ट २०२४ | ११-१२ |
| ८ | श्रमदान -दिनांक १४ ऑगस्ट २०२४ | १३ |
| ९ | भिंत्तीपत्रक प्रकाशन - दि. १५ ऑगस्ट २०२४ | १४ |
| १० | नशामुक्त भारत अभियान - शपथ - दि. १५ ऑगस्ट २०२४ | १५ |
| ११ | रक्षा बंधन दि. १९ ऑगस्ट २०२४ | १६-१७ |
| १२ | सद्भावना दिवस शपथ- दि.२० ऑगस्ट २०२४ | १७-१८ |
| १३ | विद्यापीठ वर्धापन दिन – २३ ऑगस्ट २०२४ | १९ |
| १४ | शिक्षक दिन – स्वयंशासन दिन | २० |
| १५ | आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण - दि.१८ ऑगस्ट २०२४ | २१ |
| १६ | NRD/SRD- विद्यापीठ स्तरीय पूर्व निवड प्रक्रियेत सहभाग | २२ |
| १७ | My Bharat Portal ऑनलाईन प्रशिक्षण सहभाग | २२-२३ |
| १८ | राष्ट्रीय सेवा योजना दिन | २४ |
| १९ | स्वच्छता ही सेवा- गांधी साप्ताह श्रमदान | २५ |
| २० | महात्मा गांधी व लालबहाद्दूरशास्त्री जयंती | २६ |
| २१ | Experimental Learning-सवयंसेवक जिल्हा विधी सेवा समितीला जोडले | २७-२८ |
| २२ | आव्हान -विद्यार्थी सहभाग | २७-२८ |
| २३ | युवा संवाद व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा | २८-२९ |
| २४ | विधानसभा मतदान जनजागृती | २९-३० |
| २५ | संविधान दिन | ३१ |
| २६ | जागतिक एडस दिन | ३१-३३ |
| २७ | श्री संत गाडगेबाबा पुण्यतिथी | ३४ |
| २८ | स्कूल कनेक्ट टू वाचन कार्यशाळा | ३५ |
| २९ | उत्कृष्ट स्वयंसेवक पारितोषिक | ३६ |
| ३० | राष्ट्रीय मतदार दिवस | ३७ |
| ३१ | भारतीय गणराज्य दिन - व्याख्यान | ३७-३८ |
| ३२ | संविधान गौरव व्याख्यान - भारतीय राज्यघटनेची ओळख | ३८ |

## 1) योग शिबिराचे आयोजन :-

दिनांक 21 जून, 2024 रोजी श्री संत सावता ग्रामीण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, क्रीडा विभाग व श्री संत सावता गुरुकुल प्राथमिक, माध्यमिक विभाग यांनी संयुक्तरित्या श्री संत सावता संकुलामध्ये योग व प्राणायाम शिबिराचे आयोजन केले. दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने सकाळी 7:00 ते 8:30 वाजता झालेल्या या शिबिरासाठी योग शिक्षक म्हणून संभाजीनगर शहरातील श्रीमती वंदना अवघड मॅडम व त्यांच्या सहकारी कु. रक्षा राजपूत यांनी योगाचे प्रात्यक्षिक सर्वांकडून करून घेतले. योग हा शरीरासाठी अत्यंत उपयुक्त असतो याविषयी प्रथम त्यांनी उदबोधन केले. योग प्रात्यक्षिकानंतर त्यांनी प्राणायाम घेतले. या शिबिराचे उद्घाटन तहसील तसेच पंचायत समिती कार्यालयातील गट शिक्षणाधिकारी श्रीमती क्रांती धसवाडीकर मॅडम, श्री राकेश महाजन साहेब विस्तार अधिकारी यांच्या हस्ते झाले, धसवाडीकर मॅडम यांनी योग दिनाचे महत्व सांगून सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.




योग प्रात्यक्षिक करताना डॉ. संदीप जगताप , श्रीमती वंदना अवघड, कु. रक्षा राजपूत

व्यासपीठावर श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले, श्री संत सावता गुरुकुल प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री आप्पासाहेब चव्हाण, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती उरणकर मॅडम यांची उपस्थिती होती . या

शिबिरासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक गुरुकुलातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूण 450 जणांचा शिबिरात सहभाग होता. या सर्व कार्यक्रमासाठी गुरुकुलातील सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.




योग प्राणायाम प्रात्यक्षिक करताना विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी




योग प्राणायाम करताना शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी

## २. महाराष्ट्र कृषी दिन- वृक्षारोपण:-

दि.१ जुलै २०२४ महाराष्ट्र कृषी दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सुभाष टाकले यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याबरोबरच उपप्राचार्य डॉ. पांडूरंग कल्याणकर, प्रा. डॉ.दत्तात्रय येडले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.रामकिशन लोमटे, डॉ. राजश्री पवार यांच्यासह महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात श्रमदान केले.




**वृक्षारोपण करताना प्राचार्य डॉ. सुभाष टकले व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक**




**वृक्षारोपण करताना कार्यक्रमाधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक**

## ३. जागतिक लोकसंख्या दिन :-

जागतिक लोकसंख्या दिन निमित्ताने ‘वाढती लोकसंख्या एक समस्या’ या विषयावर प्रा. डॉ. नितीन माळेगावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे हे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी ५८ विद्यार्थी उपस्थित होते.



प्रा. डॉ. नितीन माळेगावकर व्याख्यान देताना

## ४ .'एक पेड मा के नाम' महावृक्ष लागवड:-

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक :18 जुलै 2024 रोजी गणोरी येथे कडूलिंब, शिशू ची 450 वृक्ष रोपे लावण्यात आले . ' एक पेड मा के नाम ' या उपक्रमाला प्रतिसाद देत 'एक स्वयंसेवक तीन वृक्ष ' हा उपक्रम राबविण्यात आला.

गणोरी येथील वनविभागाच्या गणोरी पुर्व नियत क्षेत्रात वृक्षारोपण करण्यात आले . उद्घाटनप्रसंगी गणोरी गावच्या सरपंच सौ. सरलाताई तांदळे उपस्थित होत्या. यावेळी वनविभागाचे अधिकारी श्री कैलास पाचलोरे साहेब, वनरक्षक -मिलिंद जाधव, दीपक वाघ. वनरक्षक -कैलास जाधव, वनरक्षक- सुभाष मातेरे. वनकर्मचारी आयुब लाला, भाऊसाहेब भोसले, कोठाळे आप्पा तसेच महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर, कार्यक्रमाधिकारी डॉ . रामकिशन लोमटे, डॉ . राजश्री पवार व वृक्षारोपण करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक उपस्थित होते .







वृक्षारोपण- जागेची पाहणी करताना प्रा.डॉ. रामकिशन लोमटे, वनरक्षक श्री जाधव साहेब, लाला शेख




सांजूळ येथून वृक्ष आणताना स्वयंसेवक श्री विजय पेहेरकर व कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे



गणोरी येथे वनविभागाच्या क्षेत्रात वृक्षारोपण साठी खड्डे खोदताना स्वयंसेवक




वनविभागाच्या क्षेत्रात वृक्षारोपण करताना सरपंच सौ. सरलाताई तांदळे,व वन विभागाचे अधिकारी



वनविभागाच्या क्षेत्रात वृक्षारोपण करताना कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक

## ५. मतदार नोंदणी मार्गदर्शन शिबीर:-

जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर व तहसील कार्यालय फुलंब्री यांच्याकडून विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्राप्त झालेल्या सूचनेनुसार दि. ६ ऑगस्ट २०२४ रोजी मतदार नोंदणी मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यावेळी मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर , राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे, डॉ. राजश्री पवार व प्रा.भारत कुबेर हे उपस्थित होते. या कार्यक्रमात ३२ विद्यार्थी सभागी झाले.



मतदार नोंदणी मार्गदर्शन शिबीर- मार्गदर्शन करताना डॉ. पांडुरंग कल्याणकर



मतदार नोंदणी मार्गदर्शन शिबीर-उपस्थित विद्यार्थी

## ६. वृक्ष रोपे वाटप:-

**दि. ८ ऑगस्ट २०२४ गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाच्या निमिताने महाविद्यालयात आलेल्या अतिथी व पालक यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षांची रोपे वाटप करण्यात आले.**




वृक्ष स्वीकारताना पालक




**अतिथी पी. एस. आय. श्रीमती जाधव यांना वृक्ष देताना डॉ. गणेश कुलकर्णी**

## ७. क्रांती दिन – चित्र प्रदर्शन:-

**राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. ९ ऑगस्ट २०२४ रोजी क्रांती दिनाच्या निमित्ताने देशभक्तांची माहिती दर्शविणारे चित्रप्रदर्शन ग्रंथालयासमोर लावण्यात आले.**




**चित्रप्रदर्शन पाहताना विद्यार्थी**




**चित्रप्रदर्शन पाहताना विद्यार्थी**




**चित्रप्रदर्शन पाहताना विद्यार्थी**

## ८. श्रमदान दि.१४ ऑगस्ट २०२४:-

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर दि.१४ ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने श्रमदान घेण्यात आले. श्रमदानात २७ सवयंसेवकांनी सहभाग घेतला.




श्रमदानात सवयंसेवक सहभाग



सवयंसेवकानी श्रमदानातून स्वच्छ केलेला परिसर

## ९. भिंत्तीपत्रक प्रकाशन - दि. १५ ऑगस्ट २०२४ :-

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी ध्वजारोहण समारंभानंतर ' नशा मुक्त भारत ' या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री अनिल दुतोंडे, प्रमुख वक्ते श्री बाबासाहेब लहाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले, डॉ. संदीप जगताप व विद्यार्थी उपस्थित होते.






भिंत्तीपत्रक प्रकाशन प्रसंगी श्री अनिल दुतोंडे, श्री बाबासाहेब लहाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले, डॉ. संदीप जगताप ,डॉ. रामकिशन लोमटे व विद्यार्थी उपस्थित होते.

## १०. नशा मुक्त भारत अभियान शपथ:-

दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी ध्वजारोहण समारंभानंतर नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत नशा मुक्ती शपथ शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांना देण्यात आली.

### नशा मुक्ती शपथ

मैं प्रतिज्ञा करता हूँ कि, मै किसी भी प्रकार का नशा न करूँगा, साथ ही अपने महाविद्यालय के मित्र मोहल्ले के साथी, परिवार के सदस्य एवं समाज के स्वजनो को भी इससे दूर राखुंगा अपने देश को नशामुक्त करने के लिए अपनी क्षमता के अनुसार हर सम्भव प्रयास करूँगा। जय हिन्द!





नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत नशा मुक्ती शपथ घेताना शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी

## ११. रक्षा बंधन :-

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी रक्षा बंधन सणाच्या दिवशी पोलीस स्टेशन फुलंब्री येथे रक्षा बंधन कार्यक्रम घेतला. पोलीस अधिकारी, पोलीस व कर्मचारी यांना स्वयंसेविकांनी राखी बांधल्या. यावेळी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. रामकिशन लोमटे, हिंदी विभागाचे प्रा.डॉ.सुरेश मुंढे यांच्यासह स्वयंसेविकां व स्वयंसेवक उपस्थित होते.




पोलीस निरीक्षक श्री सहाने साहेब यांना राखी बांधताना स्वयंसेवक कु.आरती प्रधान




पोलीस स्टेशन फुलंब्री - राखी बांधल्यानंतरचे छायाचित्र



पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना राखी बांधताना स्वयंसेविका

## १२. सद्भावना दिवस - शपथ:-

भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांचा जन्म दिन २० ऑगस्ट हा भारतात सद्भावना दिवस म्हणून साजरा केला जातो. दि.२० ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सद्भावना शपथ देण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले, डॉ संदीप जगताप, कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे, डॉ. राजश्री पवार, श्री रमेश जगधने यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे यांनी केले.

**सद्भावना दिवस शपथ**

मी अशी प्रतिज्ञा करतो की/करते की, मी जात, धर्म, वंश, प्रदेश किवा भाषा विषयक भेद ना करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करीन. वैयक्तिक किवा सामुहिक स्वरूपाचे सर्व प्रकारचे मतभेद हिंसाचाराचा अवलंब न करता विचार विनिमय करून व संविधानिक मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न करीन. जय हिंद !




**सद्भावना शपथ घेताना स्वयंसेवक**



**सद्भावना शपथ घेताना स्वयंसेवक**



**सद्भावना शपथ देताना कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे**

## १३. विद्यापीठ वर्धापन दिन:-

दिनांक २३ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यापीठच्या ध्वजाचे ध्वजारोहण करून विद्यापीठ गीत घेण्यात आले.





विद्यापीठ वर्धापन दिन प्रसंगी उपस्थित प्राध्यापक, कर्मचारी व स्वयंसेवक

## १४. शिक्षक दिन – स्वयंशासन  दिन :-

दिनांक: ५ सप्टेंबर २०२४ हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला. हा दिवस महाविद्यालयात स्वयंशासन  दिन म्हणून विद्यार्थ्यांनी साजरा केला. १० विद्यार्थ्यानी अध्यापनाचे काम विद्यार्थ्यांनी केले.




शिक्षक दिन - स्वयंशासन  दिन- आध्यापन करताना विद्यार्थिनी




शिक्षक दिन - स्वयंशासन  दिन- आध्यापन करताना विद्यार्थी

## १५. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण:-

दिनांक १८ सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षक म्हणून श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील क्रीडा संचालक डॉ.संदीप जगताप हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, आपत्ती दोन प्रकारच्या असतात. नैसर्गिक आपत्ती व मानव निर्मित आपत्ती. आपत्तीच्या काळात जीविताला व संपत्तीला वाचविणे खूप आवश्यक असते. अशा वेळी आपण आपत्तीच्या घटनांचा कसा सामना करायचा याविषयी त्यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.




क्रीडा संचालक डॉ.संदीप जगताप आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन करताना.




क्रीडा संचालक डॉ.संदीप जगताप आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करताना.

## १६. राज्यस्तरीय / राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन- निवड शिबीरात सहभाग:-

राज्यस्तरीय / राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन शिबीराची निवड चाचणी दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ स्तरावर घेण्यात आली. त्यात महाविद्यालयाचे दोन विद्यार्थी कु. साक्षी भागीनाथ शेवाळे,बी.एस्सी. द्वितीय वर्ष व श्री अजिनाथ भाऊसाहेब तांदळे बी.एस्सी. द्वितीय वर्ष  हे सहभागी झाले. यात कु. साक्षी भागीनाथ शेवाळे हिची राज्यस्तरीय शिबिरासाठी निवड झाली.


Dr.Bababashaeb Ambedkar Marahtwada University, Chhatrapati Sambhajingar
National Service Scheme
LIST OF PARTICIPANTS-STATE SELECTION CAMP FOR NSS SRD / PRE RD Camp (Female)

| Sr. No | Name of the Volunteer | Name of the College | Height | Date of Birth | Wegth in Kg | Class studying in | Year of joining NSS | Contact ON |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Priyanka Sanjay Tarte | Deogiri College, Chhatrapati Sambhajinagar | 155 | 18/8/2024 | 56 | B.Sc.II | 2022 | 7798664292 |
| 2 | Sakshri Bhaginath Shivale | Sant Sawta Mali College, Phulambri, Dist. Chhatrapati Sambhajinagar | 163 | 9/2/2006 | 71 | B.Sc.II | 2023 | 9156560617 |
| 3 | Pushpa Ambadas Ghadge | Kalikadevi Arts & Commerce College, Shirur ( Kasar),Dist. Beed | 157 | 9/5/2024 | 44 | B.Sc.III | 2023 | 8805050684 |
| 4 | Nagini Fulachand Bhargarde | Bhanudasrao Chavan College Lohara Dist. Dharashiv | 165 | 30/7/2005 | 58 | BA.II | 2023 | 9370913061 |
| 5 | Payal Sanjay Gitkahane | E. S. P. M's College of Arts Bidkin Tq.Paithan.Dist. Chhatrapati Sambhajinagar. | 153 | 12/1/2006 | 60 | BA.II | 2022 | 8830738841 |
| 6 | Neha Siyaram Gupta | Shivchharapati College, Chhatrapati Sambhajinagar | 162 | 24/12/2008 | 59 | BA.II | 2022 | 9175318943 |
| 7 | Rohini Rajendr Rathod | Vivekanand College, Samarth Nagar, Chhatrapati Sambhajinagar | 163 | 11/9/2024 | 65 | B.Sc.III | 2022 | 9322789866 |
| 8 | Bhgyshree Narayan Nand | I.B.P. College, Chhatrapati Sambhajinagar | 165 | 14/12/2004 | 43 | BA.III | 2022 | 9822164899 |
| 9 | Manshi Dnyaneshwar Rajahns | M.P.Law, College, Chhatrapati Sambhajinagar | 158 | 4/6/2006 | 57 | BA.LLB.II | 2023 | 9699121562 |
| 10 | Santoshi Ashok Fatpure | Moreshwar Arts & Science College,Bhokardan, Dist. Jalna | 166 | 19/9/2024 | 64 | B.Sc.III | 2022 | 9923464563 |
| 11 | Sankruti Ramakant Yewale | R.B. Attal Arts, Science Commerce Colege, Beed | 160 | 10/7/2005 | 41 | B.Sc.II | 2023 | 8668313736 |
| 12 | Jggisha Sukhash Kabale | Rajiv Gandhi College,Karmad, Dist. Chhatrapati Sambhajinagar | 168 | 2/10/2003 | 48 | BA.III | 2022 | 8983476275 |
| 13 | Amruta Sandip Darunde | Government College of Arts & Science, Kille Ark, Chhatrapati Sambhajinagar | 157 | 7/1/2003 | 46 | BA.III | 2023 | 7620299554 |
| 14 | Sakshi Kashinath Kavade | Shivaji College of Arts, Science & Commerce, Kannad, Dist. Chhatrapati Sambhajinagar | 159 | 6/6/2004 | 50 | B.Sc.III | 2023 | 7040935761 |
| 15 | Sakshi Jitendr Umale | Milind College of Science, Chhatrapati Sambhajinagar | 154 | 9/1/2006 | 56 | B.Sc.II | 2023 | 9371753124 |
| Waiting (राखीव) | | | | | | | | |
| 1 | Shalini Vijya Dakle | P.G. Unit, Dr.BAMU. . Chhatrapati Sambhajinagar | 156 | 19/9/2004 | 40 | M.SC.II | 2020 | 7666837262 |
| 2 | Kale Pallavi Laxami | Model College Ghansawangi Dist. Jalna | 166 | 8/3/2005 | 54 | BA.II | 2024 | 8830738841 |

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर - ४३१००४

## १७. My Bharat पोर्टल ऑनलाईन प्रशिक्षण: -

महाराष्ट्र व गोवा राज्यातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी My Bharat पोर्टल ची माहिती देण्यासाठी ऑनलाईन प्रशिक्षण दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले होते. यात महाविद्यालयातील कार्यक्रमाधिकारी डॉ.रामकिशन लोमटे यांनी सहभागी घेतला.




**My bharat portal - ऑनलाईन प्रशिक्षण**

## १८. राष्ट्रीय सेवा योजना दिन - उद्बोधन वर्ग :–

दिनांक २४ सप्टेंबर २०२४ राष्ट्रीय सेवा योजना दिन निमित्ताने उद्बोधन वर्ग घेण्यात आला. स्वयंसेवक विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विषयी माहिती व्हावी या उद्देशाने हा उद्बोधन वर्ग आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख मार्गदर्शक उपप्राचार्य डॉ.पांडुरंग कल्याणकर, क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप यांनी राष्ट्रीय सेवा योजना विषयी माहिती दिली.



राष्ट्रीय सेवा योजना दिन-उद्बोधन वर्ग -मार्गदर्शन करताना डॉ.पांडुरंग कल्याणकर



राष्ट्रीय सेवा योजना दिन-उद्बोधन वर्ग -मार्गदर्शन करताना डॉ.संदीप जगताप

## १९. स्वच्छता ही सेवा :-

दिनांक १ ऑक्टोबर २०२४ 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या गेट पासून ते फुलंब्री धरण या रस्त्यावरील प्लास्टिक संकलन करण्यात आले. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या २८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.







स्वच्छता ही सेवा अंतर्गत प्लास्टिक संकलन करण्यात आले

## २०. महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती व्याख्यान:-

महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्रा.भारत कुबेर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी आपल्या व्याख्यानात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांचे जीवन व कार्य याविषयी मार्गदर्शन केले.




**महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्ताने व्याख्यान देताना प्रा. भरत कुबेर**



**महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त व्याख्यान**

## २१. Experimental Learning-सवयंसेवक जिल्हा विधी सेवा समितीला जोडले:

तालुका दिवाणी न्यायालय फुलंब्री यांनी महाविद्यालयास दिलेल्या पत्रानुसार दिनांक:०७ ऑक्टोबर २०२४ रोजी Paralegal Volunteer म्हणून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे तीन विद्यार्थी न्यायालयाशी जोडण्यात आले.१) समाधान दांगोडे - बी.ए.द्वितीय वर्ष, दत्तात्रय तोरणमल -द्वितीय वर्ष यांची नावे न्यायालयाला देण्यात आले. त्यांचे प्रशिक्षण जिल्हा विधी सेवा समिती जिल्हा न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथे दोन दिवसाच्या प्रशिक्षणास दिनांक २५ व २६ नोव्हेंबर २०२४ रोजी हे दोन्ही सवयंसेवक उपस्थित होते.

## २२. आव्हान- राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण – दोन विद्यार्थी सहभागी:-

महाराष्ट्र राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक ७ नोव्हेंबर २०२४ ते १६ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत संपन्न झाले , याची निवड चाचणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आली. त्यात महाविद्यालायातील दोन स्वयंसेवक व दोन स्वयंसेविका सहभागी झाले. त्यापैकी शिवा दांगोडे व अभिषेक पुरी या दोन स्वयंसेवकाची राज्यस्तरीय प्रशिक्षणासाठी निवड झाली. त्यांनी अमरावती येथे १० दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण केले.



अमरावती येथे आव्हान शिबिरात सहभागी स्वयंसेवक शिवा दांगोडे व अभिषेक पुरी



अमरावती येथे आव्हान शिबिरात सहभागी स्वयंसेवक  शिवा दांगोडे व अभिषेक पुरी

## २३. युवा संवाद व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा :-

माननीय जिल्हाधिकारी व सहसंचालक उच्चशिक्षण छत्रपती संभाजीनगर यांनी पत्र पाठवून असे कळविले होते की, महाविद्यालय स्तरावर  युवा संवाद व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करावी. त्यानुसार दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'युवा संवाद व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा' आयोजित करण्यात आली. व्यक्तिमत्व विकास या विषयावर प्रा. भारत कुबेर, प्रा. अर्जुन शेजूळ यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केला. संचलन व आभार डॉ. रामकिशन लोमटे यांनी केले.




युवा संवाद व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा मार्गदर्शन करताना प्रा. अर्जुन शेजूळ



युवा संवाद व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा उपस्थित विद्यार्थी

## २४. विधानसभा मतदार जागृती कार्यक्रम:-

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालय फुलंब्री यांनी दिलेल्या पत्रानुसार १०० टक्के मतदान व्हावे यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मतदार जागृती करण्यात आली.**




मतदार जागृती पत्रक वाटप करण्यात आले




पाल फाटा येथे जावून मतदार जागृती करण्यात आली




फुलंब्री गावात घरोघरी जावून मतदार जागृती करण्यात आली

## २५. संविधान दिन: -

दिनांक २६/११/२०२४ रोजी संविधान दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात संविधान वाचन घेण्यात आले. राज्यशास्त्र विभागातील प्रा. भरत कुबेर यांनी प्रस्ताविकेचे वाचन केले.




संविधान वाचन करताना प्रा. भरत कुबेर





संविधान वाचन वेळी उपस्थित स्वयंसेवक, शिक्षक व कर्मचारी

## २६. जागतिक एडस दिन :-

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक एडस दिन निमित्ताने पैठण येथील खुल्या कारागृहातील कैद्यासाठी एडस जागृती कार्यक्रम घेतला. मार्गदर्शक म्हणून पैठण ग्रामीण रुग्णालयातील एडस नियंत्रण कक्ष प्रमुख श्री बबलू गायकवाड, सौ. तारा हिवाळे व कर्मचारी उपस्थित होते.



एडस जागृती कार्यक्रम



एडस जागृती कार्यक्रम-उपस्थित कैदी

त्यानंतर दिनांक २ डिसेंबर २०२४ रोजी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात विद्यार्थ्यामध्ये एडस जागृती कार्यक्रम घेतला. एडस हा एक गंभीर आजार आहे. आजाराची कारणे व हा आजार टाळण्याची उपाययोजना याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ. नितीन माळेगावकर तर अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ.संदीप जगताप हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे व प्रा.डॉ. राजश्री पवार यांनी केले.



**एडस विषयी  जागृती करताना प्रा.डॉ. नितीन माळेगावकर**



**एडस विषयी जागृती करताना प्रा.डॉ. नितीन माळेगावकर**

## २७. श्री संत गाडगेबाबा पुण्यतिथी:-

दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी महाविद्यालयात श्री संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी प्रा.दिनेश परदेशी, प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी श्री संत गाडगेबाबा यांचे विचार व कार्य याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे यांनी अध्यक्षीय समारोप केला व आभार मानले.




श्री संत गाडगेबाबा पुण्यतिथी पुष्पहार घालून अभिवादन करताना अतिथी




श्री संत गाडगेबाबा पुण्यतिथी विचार व्यक्त करताना प्रा. दिनेश परदेशी

## २८. स्कूल कनेक्ट -२ व वाचन संकल्प कार्यशाळा :-

महाराष्ट्र शासन पुरस्कृत उपक्रम स्कूल कनेक्ट २ व वाचन संकल्प कार्यशाळा दिनांक 13 जानेवारी २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात संपन्न झाला. प्रमुख वक्ते म्हणून डॉ.बाबासाहेब डोळे (प्राध्यापक व विभागप्रमुख भौतिकशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर) हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष टकले हे होते. डॉ. बाबासाहेब डोळे यांनी वाचन संस्कृती जोपासणे ज्ञान वृद्धीसाठी आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. या बरोबरच राष्ट्रीय शैक्षिणिक धोरण २०२० नुसार येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांना कोणते बदल स्वीकारावे लागतील या विषयी मार्गदर्शन केले. ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान याचा काळ असून आपण अभ्यासातून या गोष्टी आत्मसात करणे गरजेचे आहे.




स्कूल कनेक्ट -२ व वाचन संकल्प कार्यशाळा मार्गदर्शन करताना वक्ते डॉ. बाबासाहेब डोळे




स्कूल कनेक्ट -२ व वाचन संकल्प कार्यशाळा आभार मानताना डॉ. पांडुरंग कल्याणकर

## २९. उत्कृष्ट स्वयंसेवक पारितोषिक:-

दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेह संमेलनात राष्ट्रीय सेवा योजनेत वर्ष 2024-25 मध्ये महाविद्यालय स्तरावर उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून श्री भावेश जाधव व उत्कृष्ट स्वयंसेविका कु.राधा मिसाळ यांना पारितोषिक देण्यात आले.यावेळी संस्थेचे सचिव श्री निवृत्ती पा. गावंडे,प्रमुख पाहुणे प्रा. हंसराज जाधव उपस्थित होते.



राष्ट्रीय सेवा योजनेत उत्कृष्ट स्वयंसेवक प्रमाणपत्र स्वीकारताना श्री भावेश जाधव



राष्ट्रीय सेवा योजनेत उत्कृष्ट स्वयंसेविका प्रमाणपत्र स्वीकारताना कु. राधा मिसाळ

## ३०. राष्ट्रीय मतदार दिवस:-

दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. रामकिशन लोमटे यांनी विद्यार्थ्यांना 'भारतीय लोकशाही व मतदार' याविषयी चर्चासत्र घेण्यात आले. प्रश्नोत्तरे घेण्यात आले व मार्गदर्शन केले.




राष्ट्रीय मतदार दिवस निमित्त मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. रामकिशन लोमटे

## ३१. भारतीय गणराज्य दिन - व्याख्यान :-

भारतीय गणराज्य दिन दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयात साजरा करण्यात आला. गणतंत्र दिनाचे औचित्य साधून प्रमुख वक्ते डॉ. प्रभाकर जगताप (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर जि. पुणे.) यांचे व्याख्यान आयोजित केले. यावेळी प्रमुख अतिथी श्री योगेश मिसाळ, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री अनिल दुतोंडे, प्राचार्य डॉ. सुभाष टकले व महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.




भारतीय गणराज्य दिनाला उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी

## ३२. संविधान गौरव व्याख्यान - भारतीय राज्यघटनेची ओळख:-

दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी संविधान गौरव महोत्सव अंतर्गत प्रा. डॉ. किरण धनेधर यांचे भारतीय राज्यघटनेची ओळख या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी त्यांनी भारतीय संविधानातील विविध कलमांची माहिती दिली. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रामकिशन लोमटे यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे संचलन कु.पायल तावरे व आभार कु. राधा मिसाळ हिने मांडले.




प्रा. डॉ. किरण धनेधर व्याख्यान देताना

= ० =

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

## फुलंब्री

संलग्न - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

छत्रपती संभाजीनगर

# राष्ट्रीय सेवा योजना

शैक्षणिक वर्ष-२०२४-२५

# विशेष शिबीर अहवाल

**‘यूथ फॉर डिजिटल लिटरसी व यूथ फॉर माय भारत’**

दि. ३ ते ९ जानेवारी २०२५

## मौजे - गणोरी

ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर

कार्यक्रमाधिकारी
डॉ. रामकिशन लोमटे

प्राचार्य
डॉ. सुभाष टकले

# शैक्षणिक वर्ष २०२४-२५

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | उद्घाटन समारंभ | ३-५ |
| २ | बौद्धिक सत्र पहिले - यूथ फॉर डिजिटल लिटरसी | ५ |
| ३ | व्याख्यान सत्र पहिले- समाजप्रबोधन बालविवाह प्रतिबंध | ६ |
| ४ | बौद्धिक सत्र दुसरे- व्यक्तिमत्व विकास | ७ |
| ५ | व्याख्यान सत्र दुसरे - रक्तक्षय तपासणी व मार्गदर्शन | ८ |
| ६ | बौद्धिक सत्र तिसरे- अन्नसुरक्षा | ९ |
| ७ | व्याख्यान सत्र तिसरे - बालमजुरी | ९ -१० |
| ८ | राजस्थानचे राज्यपाल मा.हरिभाऊ बागडे (नाना) यांची भेट | १० |
| ९ | बौद्धिक सत्र चौथे - मोबाईलचे दुष्परिणाम | ११ |
| १० | नेत्र तपासणी | १२ |
| ११ | व्याख्यान सत्र  चौथे - स्वसंरक्षण | १३ |
| १२ | बौद्धिक सत्र पाचवे - स्पर्धा परीक्षेतून नोकरीच्या संधी | १४ |
| १३ | व्याख्यान सत्र पाचवे - वृक्ष संवर्धन जागृती | १४ -१५ |
| १४ | बौद्धिक सत्र सहावे - पर्यावरण बदल | १५ |
| १५ | व्याख्यान सत्र सहावे - बालकांची तस्करी | १६ |
| १६ | शिबिर समारोप समारंभ | १७-१८ |
| १७ | शिबिरातील दैनंदिन उपक्रम – सकाळी ग्रामस्वच्छता | १९ |
| १८ | रंग- रंगोटी सुशोभीकरण | २० |
| १९ | पाझर खड्डे बनविणे | २१-२२ |
| २० | समाजप्रबोधन - जनजागृती दिंडी | २३-२४ |
| २१ | बालविवाह प्रतिबंध- प्रतिज्ञा | २५ |
| २२ | योग प्राणायाम | २६ |
| २३ | पथनाट्य- बालविवाह प्रतिबंध | २७ |
| २४ | शिबिरातील उपक्रमात प्रतिष्ठित नागरिकांचा सहभाग | २८-२९ |
| २५ | बातमी प्रसिद्धी | ३० |

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## १. उद्घाटन समारंभ :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित व पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सात दिवसाचे निवासी शिबीर मौजे गणोरी ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर येथे दि.३ जानेवारी ते ९ जानेवारी २०२५ या कालावधीत 'यूथ फॉर डिजिटल लिटरसी' व 'यूथ फॉर माय भारत' ही संकल्पना घेऊन आयोजित करण्यात आले. या शिबिरात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, स्वयंसेविका, प्राध्यापक, कर्मचारी व गावकरी सहभागी झाले. शिबिराचे उद्घाटन शुक्रवार, दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता झाले. उद्घाटक म्हणून प्रा. डॉ. टी. आर. पाटील माजी संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते झाले. प्रा प्रमुख पाहुणे डॉ ज्ञानेश्वर पाथ्रीकर, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती म्हणून गणोरी गावच्या सरपंच सौ. सरलाताई संतोष तांदळे,विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी गणोरीचे व्हा.चेअरमन श्री संतोष पाटील तांदळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे व डॉ. राजश्री पवार यांच्यासह गावकरी, स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.



**शिबिराचे उद्घाटन करताना अतिथी**




शिबिराचे उद्घाटक म्हणून मार्गदर्शन करताना अतिथी प्रा. डॉ. टी. आर. पाटील




शिबिराचे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना डॉ ज्ञानेश्वर पाथ्रीकर



**शिबिराला उपस्थित नागरिक व स्वयंसेवक**

## २. बौद्धिक सत्र पहिले - यूथ फॉर डिजिटल लिटरसी:-

दिनांक ३ जानेवारी २०२५ वार शुक्रवार रोजी दुपारी ३ ते ४ या वेळेत बौद्धिक सत्रात 'यूथ फॉर डिजिटल लिटरसी' या विषयावर डॉ.संदीप जगताप, डॉ. गणेश कुलकर्णी यांनी उपस्थित विद्यार्थी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. डिजिटल युगामध्ये त्यासंबंधी ज्ञान व कौशल्य सर्वांकडे असले पाहिजे. स्वयंसेवकानी 'माय भारत' पोर्टलवर नोंदणी करावी असे आवाहन त्यांनी केले.




**डॉ.संदीप जगताप, डॉ. गणेश कुलकर्णी मार्गदर्शन करताना**

## ३. व्याख्यान सत्र पहिले - समाजप्रबोधन - बाल विवाह प्रतिबंध:-

दिनांक ३ जानेवारी २०२५ वार शुक्रवार रोजी सायंकाळी ७ ते ८ या वेळेत व्याख्यान सत्रात भारुड व सांस्कृतिक कार्यक्रमातून प्रा.अनिल मगर मु.पारध ता. जाफ्राबाद यांनी बालविवाह प्रतिबंध याविषयावर समाजप्रबोधन केले. या कार्यक्रमाला गणोरी गावातील भजनी मंडळाने साथ दिली. विविध भारुडाच्या माध्यमातून त्यांनी बालविवाह प्रतिबंध, मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन, स्त्री- पुरुष समानता, हुंडा बंदी अशा विविध विषयावर त्यांनी प्रबोधन केले.




**प्रा.अनिल मगर भारुडापूर्वी मार्गदर्शन करताना**



**प्रा.अनिल मगर भारुडातून प्रबोधन  करताना**

## ४. बौद्धिक सत्र दुसरे - व्यक्तिमत्व विकास:-

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी दिनांक ४ जानेवारी २०२५ शनिवार रोजी दुपारच्या बौद्धिक सत्रात 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर प्रा.डॉ.दत्तात्रय येडले, प्रा.डॉ.संजीवकुमार पांचाळ यांनी मार्गदर्शन केले.




**प्रा.डॉ.संजीवकुमार पांचाळ व्यक्तिमत्व विकास या विषयावर विचार मांडताना**




**प्रा.डॉ.दत्तात्रय येडले, व्यक्तिमत्व विकास सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना**

## ५. व्याख्यान सत्र दुसरे - रक्तक्षय (अनेमिया) तपासणी व मार्गदर्शन:-

दिनांक ४ जानेवारी २०२५ शनिवार सायंकाळच्या व्याख्यान सत्रात ’रक्तक्षय (अनेमिया) या आजाराची आरोग्य कर्मचारी यांनी तपासणी केली. गावकरी व स्वयंसेवक यांच्या रक्ताची तपासणी करण्यात आली . डॉ. आनंद राठोड वैद्यकीय अधिकारी, आरोग्य वर्धिनी, गणोरी व  डॉ. वंदना साबळे यांनी ’रक्तक्षय (अनेमिया) या आजाराची लक्षणे व उपाययोजना याविषयी माहिती दिली.




**नागरिकांची रक्ताची तपासणी करताना आरोग्य कर्मचारी**



**’रक्तक्षय (अनेमिया) विषयी मार्गदर्शन करताना डॉ. वंदना साबळे**

## ६. बौद्धिक सत्र तिसरे - अन्नसुरक्षा:-

शिबिराचा तिसरा दिवस दिनांक ५ जानेवारी २०२५ रविवार रोजी दुपारच्या बौद्धिक सत्रात ‘अन्नसुरक्षा’ या विषयावर डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी विचार मांडले आणि प्रा. विजय पांडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. स्वयंसेवक व सवयंसेविकां उपस्थित होते.




**व्याख्यान देताना डॉ. पांडुरंग कल्याणकर**

## ७. व्याख्यान सत्र तिसरे - बाल मजुरी:-

शिबिराचा तिसरा दिवस दिनांक ५ जानेवारी २०२५ रविवार रोजी सायंकाळच्या व्याख्यान सत्रात ‘बाल मजुरी’ या विषयावर श्री अनिल वाघ संशोधक, डॉ.बा.आ.म.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी व्याख्यान दिले. या सत्राच्या अध्यक्षा म्हणून गणोरी गावच्या सरपंच सौ. सरलाताई तांदळे उपस्थित होत्या. यावेळी अनिल वाघ यांनी बालमजुरी म्हणजे काय ते समजावून सांगितले. भारतात बालमजुरीचे प्रमाण व बालमजुरी थांबविण्यासाठी शासनाने केलेले कायदे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना सरपंच सौ. सरलाताई तांदळे म्हणाल्या ग्रामीण भागात बालमजुरीचे प्रमाण शहरी भागापेक्ष कमी आहे. तरीही आपण बालमजुरी बंद करून बालकाना उत्तम शिक्षण दिले पाहिजे. यावेळी प्रतिष्ठित गावकरी स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.



'बाल मजुरी' या विषयावरील व्याख्यान सत्र

## ८. राजस्थानचे राज्यपाल मा. हरिभाऊ बागडे (नाना) यांची भेट:-

शिबिराचा चौथा दिवस दिनांक ६ जानेवारी २०२५ सोमवार रोजी दुपारी १:०० वाजता राजस्थानचे राज्यपाल मा. हरिभाऊ बागडे (नाना) यांचा दौरा गणोरी येथे होता. दरम्यान गणोरी येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिरार्थी व कार्यक्रमाधिकारी यांना भेटण्यासाठी वेळ दिली. भेटी दरम्यान शिबिरात राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची त्यांनी माहिती विचारली. शिबिरार्थी सोबत संवाद साधला व शिबिराला शुभेच्छा दिल्या.




राजस्थानचे राज्यपाल मा. हरिभाऊ बागडे नाना सोबत कार्यक्रमाधिकारी व शिबिरार्थी

## ९. बौद्धिक सत्र चौथे - मोबाईलचे दुष्परिणाम:-

शिबिराचा चौथा दिवस दिनांक ६ जानेवारी २०२५ सोमवार रोजी दुपारी ३:०० ते ४:०० यावेळेत बौद्धिक सत्रात 'मोबाईलचे दुष्परिणाम' या विषयावर प्रा.डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. मोबाईलचा अतिवापर हा आपल्या डोळ्यावर व मनावर दुष्परिणाम करणारा आहे. मोबाईलचा अतिवापर केल्यामुळे निद्रानाश होऊ शकतो. आवश्यक तेवढाच मोबाईलचा वापर करावा व दुष्परिणाम टाळावेत असे मत त्यांनी व्यक्त केले. या सत्राच्या अध्यक्ष कार्यक्रमाधिकारी डॉ. राजश्री पवार यांनी अध्यक्षीय समारोप केला. यावेळी व्यासपीठावर प्रा.एन . के. वाघ उपस्थित होत्या.



मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. मंजुषा नळगीरकर व्यासपीठावर डॉ. राजश्री पवार, प्रा.एन. के. वाघ



अध्यक्षीय समारोप करताना डॉ. राजश्री पवार

## १०. नेत्र तपासणी:-

शिबिराचा चौथा दिवस दिनांक ६ जानेवारी २०२५ सोमवार रोजी दुपारी ५:०० वाजता महाविद्यालयातील माजी विद्यार्थी श्री पंकज साळवे व श्री सुहास दुतोंडे यांनी नेत्र तपासणी करून चष्म्याचे नंबर काढून दिले.यावेळी २४ नागरिक व ३७ स्वयंसेवकानी आपले नेत्र तपासून घेतले.




नेत्र तपासणी करताना श्री पंकज साळवे व श्री सुहास दुतोंडे




'नेत्र तपासणी' करताना श्री पंकज साळवे, श्री सुहास दुतोंडे फुलंब्री व सहकारी

## ११. व्याख्यान सत्र चौथे - स्वसंरक्षण :-

दिनांक ६ जानेवारी २०२५ सोमवार रोजी सायंकाळी व्याख्यान सत्रात श्रीमती आरती जाधव (ए.पी.आय) भरोसा सेल प्रमुख, छत्रपती संभाजीनगर यांनी 'स्वसंरक्षण' या विषयावर उपस्थित स्वयंसेविका व स्वयंसेवकाना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी मुलींची फसवणूक करण्याचे प्रकार कसे घडतात याची अनेक उदाहरणे समजावून सांगितले.




श्रीमती आरती जाधव (ए.पी.आय) मार्गदर्शन करताना




श्रीमती आरती जाधव मार्गदर्शन करताना उपस्थिती सौ. सरलाताई तांदळे, श्री पांडुरंग अंभोरे

## १२. बौद्धिक सत्र पाचवे - स्पर्धा परीक्षेतून नोकरीच्या संधी :-

शिबिराचा पाचवा दिवस दिनांक ७ जानेवारी २०२५ मंगळवार रोजी दुपारी ३:०० ते ४०० या वेळेत बौद्धिक सत्रात 'स्पर्धा परीक्षेतून नोकरीच्या संधी' या विषयावर प्रा. डॉ. दिनेश काचकुरे यांनी स्वयंसेवक व स्वयंसेविकाना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्रा. भरत कुबेर यांनी केला.




मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. दिनेश काचकुरे व्यासपीठावर प्रा. भरत कुबेर व डॉ. राजश्री पवार

## १३. व्याख्यान सत्र पाचवे - वृक्ष संवर्धन जागृती :-

शिबिराचा पाचवा दिवस दिनांक ७ जानेवारी २०२५ मंगळवार रोजी सायंकाळी ७ ते ८ या वेळेत व्याख्यान सत्रात श्री कैलाश पचलोरे, वनपरिमंडळ अधिकारी, गणोरी व वनरक्षक श्री सुभाष मातेरे यांनी 'वृक्ष संवर्धन' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.




वनरक्षक श्री सुभाष मातेरे व्याख्यान देताना व्यासपीठावर अधिकारी व पदाधिकारी



**वनरक्षक श्री सुभाष मातेरे व्याख्यान देताना व्यासपीठावर वन अधिकारी व पदाधिकारी**

## १४. बौद्धिक सत्र सहावे - पर्यावरण बदल:-

**शिबिराचा सहावा दिवस दिनांक ८ जानेवारी २०२५ बुधवार रोजी दुपारी ३:०० ते ४०० या वेळेत बौद्धिक सत्रात 'पर्यावरण बदल' या विषयावर डॉ. नितीन माळेगावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पर्यावरण बदल ही जगासमोर सध्या एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. याची कारणे आणि उपाय त्यांनी सांगितले. या सत्राच्या अध्यक्ष कार्यक्रमाधिकारी डॉ. राजश्री पवार यांनी अध्यक्षीय समारोप केला.**




**डॉ. नितीन माळेगावकर मार्गदर्शन करताना**

## १५. व्याख्यान सत्र सहावे - बालकांची तस्करी:-

शिबिराचा सहावा दिवस दिनांक ८ जानेवारी २०२५ बुधवार रोजी सायंकाळी ७ ते ८ या वेळेत व्याख्यान सत्रात अॅड. प्रकाश थोरात तालुका न्यायालय फुलंब्री यांनी 'बालकांची तस्करी' या विषयावर उपस्थित गावकरी व सवयंसेवक यांना मार्गदर्शन केले. बालकांची तस्करी म्हणजे काय हे त्यांनी स्पष्ट केले. भारतातील बाल तस्करीच्या घटनांचा त्यांनी उल्लेख करून अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाय योजना त्यांनी सांगितल्या केला.




**अॅड. प्रकाश थोरात व्याख्यान देताना, प्रतिष्ठित गावकरी श्री सुदाम तांदळे, श्री पांडुरंग अंभोरे**



**अॅड. प्रकाश थोरात व्याख्यान देताना, प्रतिष्ठित गावकरी श्री सुदाम तांदळे, श्री पांडुरंग अंभोरे**

## १६. शिबीर समारोप समारंभ:-

शिबिराचा सातवा दिवस दिनांक ९ जानेवारी २०२५ गुरुवार रोजी सकाळी ११:३० वाजता शिबिराचा समारोप समारंभ सुरु झाला. शिबिराच्या समारोप समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ ज्ञानेश्वर पाथ्रीकर (जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना) उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पंडित  दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री देवजीभाई पटेल उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री निवृत्ती पा. गावंडे उपस्थित होते. तसेच समारोप समारंभासाठी येथील सौ. सरलाताई तांदळे (सरपंच, ग्रामपंचायत गणोरी), श्री संतोष पा. तांदळे (व्हा.चेअरमन विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी गणोरी) हे उपस्थित होते.




समारोप समारंभात मार्गदर्शन करताना श्री निवृत्ती पा. गावंडे, व्यासपीठावर श्री देवजीभाई पटेल, प्रा. डॉ ज्ञानेश्वर पाथ्रीकर, सौ. सरलाताई तांदळे, श्री संतोष पा. तांदळे





समारोप समारंभ व्यासपीठावर श्री निवृत्ती पा. गावंडे, श्री देवजीभाई पटेल, प्रा. डॉ ज्ञानेश्वर पाथ्रीकर, सौ. सरलाताई तांदळे, श्री संतोष पा. तांदळे

## १७. दैनंदिन उपक्रम - सकाळी ग्रामस्वच्छता:-

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे गणोरी ता. फुलंब्री येथे दि.३ जानेवारी ते ९ जानेवारी २०२५ या कालावधीत सात दिवसाचे निवासी शिबीर संपन्न झाले. शिबिरात दररोज सकाळी स्वयंसेवक व ग्रामस्थ यांनी ग्रामस्वच्छता केली.**






**दैनंदिन सकाळी ग्रामस्वच्छता करताना स्वयंसेवक**

## १८. रंग - रंगोटी करून सुशोभीकरण:-

**स्वच्छ गाव - सुंदर गाव दिसावा आणि असावा या अनुषंगाने शिबिरात ग्रामस्वच्छतेसोबतच सार्वजनिक ठिकाणी वृक्षाना व ओटयांना रंग देवून स्वयंसेवकानी गावाचे सुशोभीकरण केले.**








**स्वच्छ गाव - सुंदर गाव उपक्रम - वृक्षाना रंग देताना स्वयंसेवक**

## १९) पाझर खड्डे बनविणे: -

जमिनीतील पाणी पातळी वाढण्यासाठी पावसाचे पाणी आडवून जमिनीत जिरविणे आवश्यक आहे. या दृष्टीकोनातून राष्ट्रीय सेवा योजना सवयंसेवकांना पाझर खड्डे कसे करावेत याचे प्रशिक्षण गणोरी येथील वनविभागाच्या डोंगरावर देण्यात आले.



पाझर खड्डे बनविताना स्वयंसेवक व स्वयंसेविका




पाझर खड्डे बनविताना स्वयंसेवक व स्वयंसेविका



**पाझर खड्डे बनविताना स्वयंसेवक व स्वयंसेविका**

## २०) समाजप्रबोधन व जागृती दिंडी (Rally): -

**राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या कालावधीत पहिले तीन दिवस गणोरी गावात समाज जागृती दिंडी (Rally) काढण्यात आली.**










**समाज जागृती दिंडी (Rally)**

**गणोरी गावातील दिंडीत स्वयंसेवकानी पुढील घोषणा दिल्या :-**

१. स्वच्छ गणोरी - सुंदर गणोरी

२. स्वच्छता पाळा – रोगराई टाळा

३. गांधीजींनी दिला संदेश - स्वच्छ ठेवा भारत देश

४. गाड्गेबाबाचा एकच मंत्र – स्वच्छतेचे जाणा तंत्र

५. निसर्गाचा नियम पाळा – प्लास्टिकचा वापर टाळा

६. झाडे लावा – झाडे जगवा

७. वृक्षारोपण करूया - धर्तीचे ऋण फेडूया

८. जवळ ठेवा पुस्तके थोडी – वाचनाची लागेल गोडी

९. नियमित करू पुस्तक वाचन – हेच आपल्या प्रगतीचे साधन

१०. वाचन करा वाचन करा – हाच खरा ज्ञानाचा झरा.

११. वाचन करता मिळते ज्ञान – उंचावते आपले जीवन मान

१२. मुलगा मुलगी भेद नको – मुलगी झाली खेद नको

१३. विवाहाचा कायदा पाळा – मुलींचे बालविवाह टाळा

१४. मुलींना समजू नका भार – मुलगी आहे जीवनाचा आधार

१५. मुलगी शिकली - प्रगती झाली

१६. शिक्षणाने होते प्रगती -अज्ञानाने होते अधोगती

१७. मुलगा - मुलगी समसमान – दोघांना शिकवू करू महान

१८. पर्यावरणाची करूया नका हानी – हाच ध्यास मनोमनी

१९. पाणी आडवा - पाणी जिरवा

२०. पाणी वाचवा – जीवन वाचवा

२१. ठिबक, तुषारची किमया न्यारी–कमी पाण्यात उत्पन्न भारी

२२. प्रत्येकाचा एकच नारा – पाण्याची बचत करा

## २१) बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञा:-

राष्ट्रीय सेवा योजना शिबिर काळात जिल्हा परिषद प्रशाला गणोरी येथे शालेय विद्यार्थ्यांसोबत बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी स्वयंसेवक, स्वयंसेविका, कार्यक्रमाधिकारी डॉ.रामकिशन लोमटे, डॉ.राजश्री पवार, मुख्याध्यापक श्री देशमुख सर, शिक्षक श्री  रामेश्वर जाधव व इतर शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.




बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञा

आम्ही अशी प्रतिज्ञा करतो की, मुलीचे वय १८ वर्षाच्या आत व मुलाचे वय २१ वर्षाच्या आत असेल तर आम्ही असा बालविवाह करणार नाही. बालविवाहाच्या कोणत्याही कार्यात सहभागी होणार नाही. तसेच बालविवाहास प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष मदत करणार नाही. बालविवाहामुळे मुलांच्या शैक्षणिक, सामाजिक व शारीरिक आयुष्यावर दुष्परिणाम होतात याची आम्हाला जाणीव आहे. बालविवाह हा कायदेशीर गुन्हा असून यासाठी तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. बालविवाहाची माहिती मिळाल्यास आम्ही १०९८ या क्रमांकावर संपर्क साधू. या सामाजिक कार्यासाठी प्रशासनाला सहकार्य करू. आम्ही आमच्या गावात बालविवाह होणार नाही याची दक्षता घेऊ. बालविवाहाची पद्धत बंद करू.

जय हिंद !

## २२) योग प्राणायाम:-

राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात कार्यक्रमाधिकारी डॉ. राजश्री पवार यांनी स्वयंसेवकाना योग व प्राणायाम शिकविले.



योग व प्राणायाम शिकविताना डॉ. राजश्री पवार




योग व प्राणायाम शिकविताना डॉ. राजश्री पवार

## २३) पथनाट्य- बालविवाह प्रतिबंध:-

**राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात स्वयंसेवकांनी 'गोष्ट एका लग्नाची' हे बालविवाह प्रतिबंध पथनाट्य सादर केले. गणोरी गावात व आठवडी बाजारात असे एकूण १० प्रयोग केले.**



**पथनाट्य -'गोष्ट एका लग्नाची'**



**पथनाट्य -'गोष्ट एका लग्नाची'**

## २४) शिबिरातील उपक्रमात प्रतिष्ठित नागरिकांचा सहभाग:-

**राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील विविध उपक्रमांत गावातील सरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांनी व इतर नागरिकांची सहभाग घेतला.**




**माजी सरपंच श्री बाळासाहेब तांदळे व इतर प्रतिष्ठित नागरिक**




**गणोरीचे उपसरपंच श्री राजेंद्र तांदळे व इतर प्रतिष्ठित नागरिक**










**शिबातील विविध उपक्रमात नागरिकांनी सहभाग घेतला**

## २५. प्रसिद्धी बातमी:-

महाराष्ट्र टाइम्स

# समाजाला आपलेसे करणे महत्त्वाचे

### डॉ. ज्ञानेश्वर पाथीकर यांचे मत

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाचे 'युथ फॉर डिजिटल लिटरसी व युथ फॉर माय भारत' ही संकल्पना घेऊन तीन जानेवारीपासून सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप गुरुवार (नऊ जानेवारी) रोजी गणोरी येथे करण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर उपस्थित होते. तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे, सरपंच सरला तांदळे, सोसायटीचे व्हाइस चेअरमन संतोष तांदळे, बाळासाहेब तांदळे, भाऊसाहेब तांदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल होते.

प्रास्ताविक प्रा. डॉ. राजश्री पवार यांनी केले. काही स्वयंसेवकांनी शिबिरादरम्यान आलेले अनुभव व मनोगत व्यक्त केले. सरपंच सरला तांदळे, संतोष तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर म्हणाले, 'आपण समाजाचे काही तरी देणे लागतो. त्यासाठी समाज, निसर्ग याला आपलेसे करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जगाचा तरुणांवर विश्वास आहे. तो विश्वास सार्थकी लावण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. तसेच राष्ट्रीय सेवा योजना ही राष्ट्रीय एकात्मता व चारित्र्य संवर्धन करण्याचं काम राष्ट्रीय सेवा योजना करते.' देवजीभाई पटेल म्हणाले, शिबिरातून विद्यार्थी चांगले विचार, स्वच्छता, पाण्याचे महत्व आणि राष्ट्राच्या उन्नतीचे काम आहे. ते काम विद्यार्थ्यांनी आनंदाने केले पाहिजे.' सूत्रसंचालन ऋतुजा अंभोरे हिने तर आभार प्रा. डॉ. रामकिशन लोमटे यांनी मानले.

= =